## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

### अपिल क्रमांक : के.आर- २२३४/२०२६

**अपिलार्थी, श्रीम.मंगल विजय राऊत,**
२, गणेश दर्शन बिल्डींग, जगदुशानगर,
गोळीबार रोड, घाटकोपर (प.), मुंबई ८६.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी
अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१ ठाणे,
पार्कींग प्लाझा इमारत, आठवा मजला, सर्व्हीस रोड,
पूर्व द्रुतगती महामार्ग, विवियाना मॉल जवळ,
ठाणे (प.), जि.ठाणे ४०० ६०१.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा कार्यकारी
अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१ ठाणे,
पार्कींग प्लाझा इमारत, आठवा मजला, सर्व्हीस रोड,
पूर्व द्रुतगती महामार्ग, विवियाना मॉल जवळ,
ठाणे (प.), जि.ठाणे ४०० ६०१.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २२.०९.२०२६**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १२.०२.२०२६ | -- | २०.०३.२०२६ | २४.०४.२०२६ |

अपिलार्थी यांनी दि. २२.०५.२०२६ रोजीच्या अर्जान्वये *" प्रथम अपिल मध्ये आदेश होऊन सुध्दा संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. "*असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २२.०९.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). जन माहिती अधिकारी श्रीम.सीमा चव्हाण, उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१, ठाणे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" बी-१ EE ५६-२०२४-२५ या कराराचे कार्यआरंभ (WORK ORDER) आणि मंजूर निविदा यांची सत्य छायांकित प्रत देण्यात यावी. "*

तद्नंतर अपिलार्थी यांनी दि.२०.०३.२०२६ रोजी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे प्रथम अपील सादर केले आहे.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि.२४.०४.२०२६ रोजी पुढीलप्रमाणे आदेश पारित केले आहेत.

*"जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयीन अभिलेख्यात उपलब्ध असलेली माहिती अर्जदारांना पुढील १० दिवसांचे आत विनामुल्य पुरविण्यात यावी. तसेच माहिती पुरविण्याबाबत झालेल्या विलंबाबाबत खुलासा सादर करावा. यास्तव अपिलाचे हे प्रकरण अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे."*

सदर प्रकरणी आजच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असे नमूद केले की, त्यांना माहिती प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानंतरही प्राप्त झालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असे नमूद केले की, सदर माहिती अर्जात मागीतलेली माहिती पुरविणेबाबत वरिष्ठ लिपीक तथा सहा.जन माहिती अधिकारी, निविदा शाखा यांना दि.२५.०२.२०२६ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. तथापि त्यांचेकडे माहिती प्राप्त झालेली नसल्यामुळे अपिलार्थी यांना पुरविता आलेली नाही.

अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, सकृतदर्शनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानंतरही माहिती दिलेली नाही. आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सदर माहिती अपिलार्थी यांना पुरविणे योग्य होईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी **अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली** संपूर्ण माहिती **३० दिवसात शिघ्र टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २२ सप्टेंबर, २०२६ .

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ